PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bhau Maza Pathirakha
Year: 2011
Song: Karanda Kunkwacha
Lyricist: Jagdish Khebudkar

करंडा कुंकवाचा
लाखाची ठेव लाभली
करंडा कुंकवाचा
लाखाची ठेव लाभली
राणीला शोभे राजा
राजाला राणी शोभली
करंडा कुंकवाचा
लाखाची ठेव लाभली

कुठं गं त्याला ठेवू
किती करू मी सेवा
भाग्याचा आज वाटे
माझा मलाच हेवा
कुठं गं त्याला ठेवू
किती करू मी सेवा
भाग्याचा आज वाटे
माझा मलाच हेवा
हृदय मंदिरात
हृदय मंदिरात
प्रेमाची ज्योत जागली
करंडा कुंकवाचा
लाखाची ठेव लाभली

कळीचे झाले फुलं
फुलात तुझा भास
गंधात धुंद झाला
दोघांचा सहवास
कळीचे झाले फुलं
फुलात तुझा भास
गंधात धुंद झाला
दोघांचा सहवास
निसर्ग गाई गाणे
निसर्ग गाई गाणे
मैफल अशी रंगली
करंडा कुंकवाचा
लाखाची ठेव लाभली

स्पर्शाने जादू केली
शहारा अंगी आला
दवाचे झाले मोती
गुलाब चिंब न्हाला
स्पर्शाने जादू केली
शहारा अंगी आला
दवाचे झाले मोती
गुलाब चिंब न्हाला
धुक्याच्या पडद्यात
धुक्याच्या पडद्यात
भेट ही जगा वेगळी
करंडा कुंकवाचा
लाखाची ठेव लाभली
करंडा कुंकवाचा
लाखाची ठेव लाभली

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*